pnb Housing Finance Limited

नोंद. कार्यालय: नवया मजला, अंतरिक्ष भवन, 22, के. जी. मार्ग, नवी दिल्ली- 110001. फोन: 011-23357171, 23357172, 23705414, वेबसाईट: www.pnbhousing.com

शाखा कार्यालय : कार्यालय क्र. 302, तिसरा मजला, घेवाला कॉम्प्लेक्स, स्टेशन रोड, चिंचवड, पुणे, महाराष्ट्र -411019.
शाखा कार्यालय : 5 ए, बी, सी, डी, पाचवा मजला, श्रीरंग हाऊस, जंगली महाराज मंदिर समोर, जे एम रोड, शिवाजी नगर, पुणे, महाराष्ट्र - 411005.

ताबा सूचना (अचल मालमत्तेसाठी)

ज्याअर्थी, निम्नस्वाक्षरीकार हे पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड, चे प्राधिकृत अधिकारी असून त्यांनी सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शीअल ॲसेट्स अंतर्गत आणि एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अधिनियम, 2002 मधील अनुच्छेद 8(1) चे पालन करीत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 3 सह वाचण्यात येणाऱ्या अनुच्छेद 13(12) अंतर्गत बहाल करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करीत प्रत्येक खात्यासमोर नमूद दिनांकास मागणी सूचना पाठविल्या ज्यांत त्या-त्या कर्जदारास प्रत्येक खात्यासमोर नमूद करण्यात आलेल्या रकमेची सदर सूचनेच्या दिनांकापासून / सदर सूचना प्राप्त होण्याच्या दिनांकापासून 60 दिवसांचे आत परतफेड करण्याचे आवाहन करण्यात आले होते. कर्जदारांनी सदर रकमेची परतफेड न केल्याने याद्वारे कर्जदार व सर्व लोकांना सूचित करण्यात येते की निम्नस्वाक्षरीकारांनी सदर नियमांमधील नियम 8 सह वाचण्यात येणाऱ्या सदर अधिनियमातील अनुच्छेद 13(4) अंतर्गत बहाल करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करीत प्रत्येक खात्यासमोर नमूद करण्यात आलेल्या दिनांकास खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा ताबा घेतलेला आहे.

कर्जदार व सर्व लोकांना याद्वारे सावधगिरीची सूचना देण्यात येते की त्यांनी सदर मालमत्तांच्या संदर्भात कोणताही व्यवहार करू नये आणि असा कोणताही व्यवहार केल्यास तो पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड यांच्या सदर रक्कम आणि तीवरील कर्ज करारानुसार व्याज एवढ्या रकमेच्या भाराधीन असेल. **सदर अनामत मत्ता सोडवून घेण्यासाठी उपलब्ध असलेल्या वेळेच्या संदर्भात कर्जदारांचे लक्ष सदर अधिनियमातील अनुच्छेद 13 मधील उप-विभाग (8) कडे वेधण्यात येते.**

कर्ज खाते क्र.	कर्जदार/सह-कर्जदार/ जामीनदार यांचे नाव	मागणी सूचना दिनांक	थकबाकी रक्कम	ताबा घेतल्याचा दिनांक	तारण मालमत्तेचे वर्णन
HOU/PM/0921/915209, शाखा : पिंपरी चिंचवड	आकाश अण्णाराव सुखसे / धनशाली कृष्ण भागवत	08-10-2024	रु. 17,86,216.02/- (रुपये सतरा लाख शाहऐंशी हजार दोनशे सोळा आणि दोन पैसे फक्त)	11-04-2025 (प्रत्यक्ष)	विंग सी, 5वा मजला, फ्लॅट क्र. 517, हॅपी सिटी-वराळे, सर्व्हे क्र. 47 पी, 48 पी, हिंदुस्थान पेट्रोलियम समोर, वराळे फाटा, **गाव वराळे ता. मावळ, पुणे, महाराष्ट्र - 410507.**
HOU/PUN/0319/660974, शाखा : पुणे	योगेश कारभारी इंगोले / सुरेखा कारभारी इंगोले	13-11-2024	रु. 20,69,825.01 (रुपये वीस लाख एकोणसतर हजार आठशे पंचवीस आणि एक पैसा फक्त)	11-04-2025 (प्रत्यक्ष)	फ्लॅट क्र. 408, 4था मजला, बिल्डिंग बी, आयुष पार्क कॉम्प्लेक्स, स. क्र. 32, हिस्सा क्र. 2/1 ते 2/7, तळेगाव दाभाडे, वराळे, **पुणे, महाराष्ट्र - 410507.**

ठिकाण :- पिंपरी चिंचवड, पुणे, दिनांक :- 15-04-2025 **प्राधिकृत अधिकारी, पीएनबी हाऊसिंग फायनान्स लि.**

---

pnb Housing Finance Limited

सिक्युरीटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल ॲसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 (सरफेसी कायदा) अंतर्गत पीएनबी हाऊसिंग फायनान्स कडे भारग्रस्त असलेल्या स्थावर मालमत्तेची खाजगी कराराद्वारे विक्रीची सूचना

भानुदास सतुराम बेलेकर / नंदिनी भानुदास बेलेकर, फ्लॅट क्र. 7, स. क्र. 28, बिल्डिंग ई, 2रा मजला, श्री गणेश विहार सीएचएसएल, गणेश मंदिराजवळ, हडपसर, पुणे, महाराष्ट्र - 411028, पुणे, भारत.
कर्ज खाते क्र. : HOU/KNDW/0720/805334
शाखेचा पत्ता : पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड, 560, पाचवा मजला, मार्व्हल व्हिस्टा, एस. क्र. 599ए=598+593ए, साहनी सुजान पार्क, लुझा नगर, पुणे, महाराष्ट्र - 411040.
प्राधिकृत अधिकाऱ्याची माहिती : नाव : निलाक्षी पाटील
शाखेचा फोन क्र. : ई-मेल आयडी : NILAKSHI.PATIL@PNBHOUSING.COM, मोबाईल क्र. : 9266159423
खाजगी करार 30 एप्रिल 2025 रोजी अंमलात आणला जाईल.

खरेदीदार ओळखण्यात आले.
पीएनबी हाऊसिंग फायनान्स लि. चे प्राधिकृत अधिकारी म्हणून अधोस्वाक्षरीकाराने सरफेसी कायदा, 2002 च्या कलम 13(4) अंतर्गत अनुसूचित केलेल्या मालमत्तेचा ताबा घेतला आहे. जाहीर बोली आमंत्रित करून लिलाव करण्याचे मागील सर्व प्रयत्न अयशस्वी झाले आहेत. त्यामुळे, सामान्य जनतेला सूचित केले जात आहे की, पीएनबी हाऊसिंग फायनान्स लि. ला मान्य असलेल्या अटींनुसार, देय वसुलीसाठी अनुसूची मध्ये नमूद केलेली सुरक्षित मालमत्ता **"जशी आहे जेथे आहे", "जशी आहे जे काही आहे"** तत्त्वावर खाजगी कराराद्वारे विक्रीसाठी उपलब्ध आहे. खाजगी कराराद्वारे मालमत्तेच्या विक्रीसाठी चे मानक अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत :

1. ही विक्री खाजगी कराराद्वारे "जशी आहे जेथे आहे", "जशी आहे जे काही आहे" तत्त्वावर असेल. त्यामुळे, कोणतीही जाहीर बोली आमंत्रित केली जाणार नाही.
2. खरेदीदाराने मालमत्तेच्या खरेदीसाठी बँकेने ऑफर स्वीकारल्याच्या पुढील कामकाजाच्या दिवशी विक्रीच्या मोबदल्याच्या 25% रक्कम आणि उर्वरित रक्कम त्यानंतर 15 दिवसांच्या आत जमा करणे आवश्यक आहे.
3. खरेदीदाराने ऑफर केलेल्या रकमेच्या 10% रक्कम अर्जासोबत जमा करावया लागतील ज्याचे समायोजन वरील खंड (2) नुसार ठेवीच्या 25% वर केले जाईल.
4. वरील खंड (2) नुसार आवश्यक असलेली रक्कम पाठविण्यात अयशस्वी झाल्यास, आधीच भरलेली रक्कम अर्जासोबत भरलेल्या रकमेच्या 10% सह जप्त केली जाईल.
5. पीएनबी हाऊसिंग फायनान्स ने खरेदीची ऑफर न स्वीकारल्यास, अर्जासह भरलेली 10% रक्कम कोणत्याही व्याजाशिवाय परत केली जाईल.
6. सदर मालमत्ता पीएनबी हाऊसिंग फायनान्स ला ज्ञात किंवा अनोळखी सर्व विद्यमान आणि भविष्यातील भारांसह विकली जात आहे. प्राधिकृत अधिकारी /सुरक्षित धनको कोणत्याही तृतीय पक्षाच्या दाव्यासाठी / अधिकार / देयांसाठी कोणत्याही प्रकारे जबाबदार असणार नाही.
7. खरेदीदाराने त्याच्या समाधानासाठी मालमत्तेशी संबंधित (खाजगी कराराद्वारे विक्री अंतर्गत) सर्व पैलूंवर योग्य परिश्रम घेतले पाहिजे. या संदर्भात नंतरच्या तारखेला प्राधिकृत अधिकारी / सुरक्षित धनको यांच्याविरुद्ध कोणताही दावा करण्याचा खरेदीदारास अधिकार असणार नाही.
8. कोणतेही कारण न देता खरेदीची कोणतीही ऑफर नाकारण्याचा अधिकार पीएनबीएचएफएल यांनी राखून ठेवला आहे.
9. एकापेक्षा जास्त ऑफरच्या बाबतीत, पीएनबीएचएफएल सर्वोच्च ऑफर स्वीकारेल.
10. इच्छुक पक्ष अधिक तपशील / स्पष्टीकरणासाठी आणि त्यांचा अर्ज सबमिट करण्यासाठी प्राधिकृत अधिकाऱ्याशी संपर्क साधू शकतात.
11. मालमत्तेच्या खरेदी करिता सर्व मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क, आणि इतर खर्च, कर, शुल्क, सोसायटीची देय रक्कम खरेदीदारास सहन करावी लागेल.
12. विक्री सरफेसी कायदा / नियमांच्या तरतुदींनुसार केली जाईल.

अनुसूची - राखीव किंमत (रु.) (ज्याच्या खाली मालमत्ता विकल्या जाणार नाहीत), रु. 18,71,000/- (फक्त)
मालमत्तेचे वर्णन : फ्लॅट क्र. 7, स. क्र. 28, बिल्डिंग ई, 2रा मजला, श्री गणेश विहार सीएचएसएल, गणेश मंदिराजवळ, हडपसर, पुणे, महाराष्ट्र - 411028, पुणे, भारत. कर्ज खाते क्र. :- HOU/KNDW/0720/805334, एकूण रु. 18,71,000/- (रुपये अठरा लाख एक्काहत्तर हजार फक्त)

दिनांक : 15.04.2025, ठिकाण : कोंढवा **पीएनबी हाऊसिंग फायनान्स करिता (प्राधिकृत अधिकारी)**

ॲक्सिस बँक लि.

नोंदणीकृत कार्यालय : त्रिशूल, ३रा मजला, समर्थेश्वर मंदिरासमोर, लॉ गार्डन, एलिस ब्रीज, अहमदाबाद - ३८० ००६.
शाखा कार्यालय : ॲक्सिस बँक लि., स्टर्लिंग प्लाझा, तळमजला, साई सेवा पेट्रोल पंप समोर, जे.एम.रोड, पुणे-४११००४.

ताबा नोटीस (रूल ८(१))

ज्याअर्थी खाली सही करणार **ॲक्सिस बँक लि.** अधिकृत अधिकारी यांनी दि सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल ॲसेटस् ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ च्या सेक्शन १३(१२) आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स २००२ च्या **रूल ३** अंतर्गत प्राप्त अधिकारांचा वापर करून कर्जदार/सह-कर्जदार/गहाणदार यांना खालील नमूद तारखांना मागणी नोटीस बजावली होती की, त्यांनी सदर नोटीसीत त्यांच्या नावासमोर नमूद केलेली, बँकेला येणे असलेली रक्कम सदर नोटीसीच्या तारखेपासून **६० दिवसांच्या** आत परत करावी. कर्जदार/सह-कर्जदार/गहाणदार सदर रक्कम परत करण्यास असमर्थ ठरल्यामुळे विशेषत: खालील नमूद केलेले कर्जदार/सह-कर्जदार/गहाणदार तसेच सर्वसाधारण जनता यांना नोटीस देण्यात येते की, खाली सही करणार यांनी सदर कायद्याच्या सेक्शन १३(४) आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स २००२ च्या रूल ६ व ८ अंतर्गत प्राप्त अधिकारांचा वापर करून खाली नमूद केलेल्या गहाण मालमत्तांचा खालील नमूद तारखांना **प्रत्यक्ष ताबा** घेतला आहे. विशेषत: कर्जदार/सह-कर्जदार/गहाणदार तसेच सर्व साधारण जनता यांना सावध करण्यातयेते की त्यांनी सदर मालमत्ता संदर्भात कोणताही व्यवहार करू नये. असा व्यवहार केल्यास नमूद केलेल्या रकमेसाठी **ॲक्सिस बँक लि.** च्या रकमेच्या अधीन राहील. सुरक्षित आस्ति सोडविण्यासाठी संलग्न उपलब्ध वेळेमध्ये कर्जदाराचे लक्ष सरफेसी ॲक्ट २००२ च्या सेक्शन १३(८) अंतर्गत तरतुदींकडे वेधून घेतले जात आहे.

अ.क्र.	कर्जदार/सह-कर्जदार/जामीनदार/गहाणदार यांची नावे आणि पत्ते	तारखेनुसार थकबाकी (रु.)
१.	**१) राजश्री आर मालुसरे २) प्रीतम मालुसरे, दोन्ही रा.** सर्वे नं.६७, राजाराम नगर, न्यू सांगवी, पुणे, महाराष्ट्र - ४११०२७, **तसेच :** फ्लॅट नं.एस४-२०३, दुसऱ्या मजल्यावर, शगुन नावाच्या इमारतीत, सर्वे नं.३६/१२/बी, किवळे नाका समोर, मुंबई पुणे बायपास जवळ, किवळे पुणे. **तसेच नं.१ :** श्री तृप्ती वॉच अँड मॉडेल शॉप, सर्वे नं.७०/३/३, न्यू सांगवी, पुणे-४११०२७.	**रु. १८,४२,९१७/- (रुपये अठरा लाख बेचाळीस हजार नऊशे सतरा फक्त) दि.१६/०१/२०२३** रोजी रक्कम देय रक्कम आहे आणि (या रकमेमध्ये **दि.१६/०१/२०२३** पर्यंत लागू केलेले व्याज समाविष्ट आहे) आणि **दि.१६/०१/२०२३** त्यावरील सदर रक्कम परत करेपर्यंतचे करारानुसार झालेले/होणारे व्याज, अनुषंगिक खर्च, शुल्क व्याजासहित.
	मागणी नोटीसीची तारीख : २१/०१/२०२३	**प्रत्यक्ष ताबा घेतल्याची तारीख : ११/०४/२०२५**
	गहाण मालमत्तेचे तपशील : मालमत्तेचे सर्व सामाईक भाग, फ्लॅट नं.एस४-२०३, दुसऱ्या मजल्यावर, शगुन (एस.एस. लँडमार्क) नावाच्या इमारतीत, कार्पेट/विकीयोग्य क्षेत्रफळ ४९.८८ चौ. मीटर सर्वे नं.३६/१२/बी, किवळे नाका समोर, मुंबई पुणे बायपास जवळ, किवळे पुणे. आणि चर्तु:सीमा महसूल नोंदीनुसार.	

दिनांक : ११/०४/२०२५ **सही/-**
ठिकाण : पुणे **(टिप : स्वैर भाषांतर तफावत पडल्यास मूळ इग्रजी ग्राह्य)** **प्राधिकृत अधिकारी, ॲक्सिस बँक लि.**

आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड IDFC FIRST Bank

(पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड जी आयडीएफसी बँक लिमिटेड मध्ये विलीन होऊन आता आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखण्यात येते) । CIN : L65110TN2014PLC097792
नोंदणीकृत कार्यालय : केआरएम टॉवर्स, आठवा मजला, हॅरिंगटन रोड, चेटपेट, चेन्नई - 600031.
टेली : +91 44 4564 4000 । फॅक्स : +91 44 4564 4022

सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल ॲसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 च्या अनुच्छेद 13(2) अंतर्गत सूचना.

खालील कर्जदार व सह-कर्जदारांनी **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड जी आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन होऊन आता आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखण्यात येते)** कडून खाली नमूद सुरक्षित कर्जे घेतली होती. खाली नमूद कर्जदार व सह-कर्जदारांची कर्जे त्यांच्या संबंधित मालमत्तांचे तारण ठेवून सुरक्षित करण्यात आले होते. ते संबंधित कर्ज करारातील अटी व शर्तीचे पालन करण्यात असमर्थ ठरल्याने व ते अनियमित झाल्याने त्यांची कर्जे आरबीआय च्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार अनुत्पादक मत्ता म्हणून वर्ग करण्यात आलेली आहेत. खालील तक्त्यात जारी करण्यात आलेल्या संबंधित सूचनांनुसार त्यांना **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड जी आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन होऊन आता आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखण्यात येते)** यांना देय असणारया संबंधित रकमा देण्यात आलेल्या आहेत आणि त्यांवर पुढील व्याजही लागू असेल आणि हे व्याज त्यांच्या संबंधित दिनांकापासून करारातील दराने आकारण्यात येईल.

अ. क्र.	कर्ज खाते क्र.	कर्जाचा प्रकार	कर्जदार व सह-कर्जदाराचे नाव	अनुच्छेद 13(2) सूचना दिनांक	अनुच्छेद 13(2) सूचनेनुसार थकबाकी रक्कम
1	96522446	मालमत्तेवरील कर्ज	1. दत्तात्रय शिवाजी घोगरे 2. विठ्ठल शिवाजी घोगरे	12.03.2025	रु. 5,27,647.65/-

मालमत्तेचा पत्ता : पुढील मालमत्तेचे सर्व खंड आणि तुकडे, गावठाण निवासी मालमत्ता संबंधित बावडा ग्रामपंचायत मिळकत क्र. 0373, क्षेत्रफळ 2500.00 चौ. फू., बावडा येथे स्थित, ग्रामपंचायतीच्या स्थानिक हद्दीत, ता. : इंदापूर, जिल्हा : पुणे, महाराष्ट्र - 413103, आणि **चतु:सीमा पुढीलप्रमाणे: पूर्व:** सार्वजनिक रस्ता, **पश्चिम:** श्री. पोपट बलभीम घोगरे यांची मालमत्ता, **उत्तर:** श्री. जालिदर विकास घोगरे यांची मालमत्ता, **दक्षिण:** श्री. सुरघ बलभीम घोगरे यांची मालमत्ता.

याद्वारे आपणांस सदर सूचना प्रकाशित होण्याच्या दिनांकापासून 60 दिवसांचे आत वरील तक्त्यात दर्शविलेल्या तपशिलानुसार **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड जी आयडीएफसी बँक लिमिटेडशी विलीन होऊन आता आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखण्यात येते)** यांना आपणाकडून घेणे असलेल्या रकमेचा त्यांच्या संबंधित दिनांकापासूनच्या कंत्राटी दरावरील व्याजासह आणि इतर खर्च व शुल्कांसह भरणा करण्याचे आवाहन करण्यात येते, असे न केल्यास निम्नस्वाक्षरीकारांना **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड जी आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन होऊन आता आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखण्यात येते)** यांना घेणे असलेल्या रकमेच्या वसुलीसाठी वर नमूद तारण मालमत्तेविरुद्ध सर्फेसी अधिनियमाच्या अनुच्छेद 13(4) व अनुच्छेद 14 अंतर्गत नाईलजाने पावले उचलावी लागतील. याशिवाय आपणांस सदर अधिनियमाच्या अनु. 13(13) अंतर्गत सदर अनामत मत्तेचे विक्री / भाडेपट्टी किंवा इतर कोणत्याही पद्धतीने हस्तांतरण करण्यास प्रतिबंध करण्यात येतो.

दिनांक : 16.04.2025 **स्वा/- प्राधिकृत अधिकारी, आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड**
स्थान : पुणे **(पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड जी आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन होऊन आता आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखण्यात येते)**

UGRO CAPITAL

यू ग्रो कॅपिटल लिमिटेड

4था मजला, टॉवर 3, इक्विनॉक्स बिझनेस पार्क, एलबीएस रोड, कुर्ला, मुंबई 400070.

मागणी सूचना

वित्तिय मत्तेची सुरक्षितता आणि पुनर्रचना आणि सुरक्षा हित कायदा, 2002 ("कायदा") ची अंमलबजावणी आणि सुरक्षा हीत (अंमलबजावणी) नियम, 2002 ("नियम") च्या तरतुदी अंतर्गत.

यू ग्रो कॅपिटल लिमिटेड चे प्राधिकृत अधिकारी असलेल्या निम्नस्वाक्षरीकारांनी नियम 3 यासह वाचलेल्या कायद्याच्या कलम 13(2) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांच्या अंमलबजावणीत आणि कायद्याअंतर्गत उक्त सूचनेच्या स्वीकृतीच्या तारखेपासून 60 दिवसांच्या आत संबंधीत सूचनेमध्ये नमूद केलेल्या रकमेची परतफेड करण्याकरिता खालील कर्जदारावर फर्मांविणारी कायद्याच्या कलम 13(2) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांच्या अंमलबजावणीत मागणी सूचना निर्गमित केली आहे. निम्नस्वाक्षरीकारांना रास्त विश्वास वाटतो की कर्जदार मागणी सूचना स्वीकारण्यास टाळाटाळ करीत आहेत, त्यामुळे नियमानुसार प्रत्ययोजन व प्रसिद्धीद्वारा सूचनेच्या पोचवणीस बाधा होत आहे. मागणी सूचनेचा समाविष्ट तपशील याखाली नमूद केला आहे :

अ. क्र.	कर्जदाराचे नाव	मागणी सूचनेचा दिनांक आणि रक्कम
1	1) व्ही.आर. टूलिंग 2) पनाबाई बाळू राठोड 3) विकास राठोड कर्ज खाते क्र.: UGPUNMC0000007488	**मागणी सूचना दिनांक: 07-03-2025 रक्कम : रु. 30,67,088.00/-** (रुपये तीस लाख सदुसष्ट हजार अठ्ठ्याऐंशी फक्त) **दिनांक 07-03-2025 रोजी नुसार**
मालमत्तेचे वर्णन :- मेक : सीएनसी व्हर्टिकल मशीनिंग सेंटर मॉडेल-VI 1300 मॉडेल : एस अँड टी मशिनरी प्रा. लि. 232400222		

कर्जदार यांना याद्वारा सल्ला देण्यात येतो की त्यांनी मागणी सूचनेचे अनुपालन करावे आणि प्रदानाच्या वसुलीच्या तारखेपर्यंत लागू व्याज, अतिरिक्त व्याज, बाउन्स आकार, किंमत व खर्च यासह एकत्रीत या प्रसिद्धीच्या तारखेपासून 60 दिवसांच्या आत यावर दिलेली आणि त्यात नमूद केलेल्या मागणी रकमेचे प्रदान करावे. कर्जदार यांनी नोंद घ्यावी की **यू ग्रो कॅपिटल लिमिटेड** सुरक्षित धनको आहेत कर्जदार द्वारा लाभ घेतलेली कर्ज सुविधा ऋणकोद्वारा गहाण ठेवलेल्या सुरक्षित मत्ता म्हणून असलेल्या स्थावर मालमत्तेच्या अनुसार सुरक्षित कर्ज आहे. जर कर्जदार विनिर्दिष्ट वेळेच्या आत त्यांची दायित्वे संपूर्णपणे सोडविण्यास असमर्थ ठरल्यास **यू ग्रो कॅपिटल लिमिटेड** अंतर्भूत सुरक्षित मत्तेचा ताबा घेण्याकरिता कायद्याच्या कलम 13(4) अंतर्गत सर्व हक्कांच्या अमंलबजावणीस हक्कदार असेल, परंतु त्याखालील नियम आणि कायद्याअंतर्गत उपलब्ध अन्य कोणत्याही मार्गे विनती करुन किंवा विक्रिद्वारा किंवा सदर मालमत्तेच्या हस्तांतरणाच्या मर्यादेत आणि प्रदानाच्या वसुलीकरिता नाही. यू ग्रो कॅपिटल लिमिटेड कडे विक्रि किंवा हस्तांतरणाकरिता हक्कांचा वापर करण्यापूर्वी सुरक्षित मत्ता **मोहोरबंद करणे आणि / किंवा जप्त** करण्याचा अधिकारसुद्धा आहेत. सुरक्षित मत्तेच्या विक्रिनंतर, जर **यू ग्रो कॅपिटल लिमिटेड** च्या देय रकमेची वसुली अपुरी पडल्यास गहाण असलेल्या मालमत्तेच्या मूल्याबाबत उर्वरित देणींच्या वसुलीकरिता **यू ग्रो कॅपिटल लिमिटेड** कडे स्वतंत्र विधि प्रक्रिया सुरु करण्याचा हक्क सुद्धा आहे. हा कोणत्याही अन्य कायद्याअंतर्गत यू ग्रो कॅपिटल लिमिटेड कडे उपलब्ध अन्य सर्व अतिरिक्त आणि स्वतंत्र उपाय आहे. कायद्याच्या कलम 13(13) यापुढे आणि सुरक्षित मत्तेच्या विमोचनाकरिता उपलब्ध वेळेत कायद्याच्या कलम 13(8) कडे कर्जदार चे लक्ष वेधीत आहोत, ज्यायोगे ऋणकोंना **यू ग्रो कॅपिटल लिमिटेड** च्या पूर्व - लेखी परवानगीशिवाय, सुरक्षित मत्तेचा व्यवहार किंवा कोणत्याही सुरक्षित मत्तेची विक्रि, भाडेपट्टा किंवा अन्यथा कोणत्याही (अन्य सामान्य व्यवसायाखेरीज) तरहेने त्याची वासलात लावण्यास मना केलेली आहे / प्रतिबंध करण्यात आले आहे आणि त्याचे अनुपालन न झाल्यास उक्त कायद्याच्या कलम 29 अंतर्गत दंडनीय गुन्हा आहे. मागणी सूचनेची निम्नस्वाक्षरीकाराकडे उपलब्ध आहे आणि कर्जदार, जर ते इच्छुक असल्यास, सदर प्रत नेहमीच्या कार्यालयीन वेळेत कामाच्या कोणत्याही दिवशी निम्नस्वाक्षरीकारांकडून गोळा करु शकतील.

स्थळ : पुणे **स्वा./- विशाल आमले (प्राधिकृत अधिकारी)**
तारीख : 16.04.2025 **यू ग्रो कॅपिटल लिमिटेड करिता, authorised.officer@ugrocapital.com**

SBI

स्टेट बँक ऑफ इंडिया

बारामती शाखा - ००३२१
अब्दुल पुरकर बिल्डींग, भिगवण रोड, बारामती, पुणे - ४१३१०२., फोन : ७७१०००८९७१ ई-मेल : sbi.00321@sbi.co.in

विक्री सुचना स्थावर मिळकती करीता

सिक्युरिटायझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेटस् ॲन्ड इन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इन्टरेस्ट ॲक्ट २००२ मधील नियम ८(६), सिक्युरिटी इन्टरेस्ट (इन्फोर्समेंट) नियम २००२ च्या अन्वये स्थावर मिळकतींची विक्री करण्याकरिता ई-लिलाव विक्री सूचना.

तमाम लोकांस व विशेषत: कर्जदार/हमीदार यांना सदर नोटीसीने कळविण्यात येते की, खाली नमूद स्थावर मिळकत/मिळकती ज्या सेक्युअर्ड क्रेडीटर यांचेकडे गहाण/ताब्यामध्ये आहेत, ज्याचा प्रत्यक्ष ताबा अधिकृत अधिकारी, स्टेट बँक ऑफ इंडिया सेक्युअर्ड क्रेडीटर यांनी घेतला आहे, त्यांची विक्री 'जसे आहे तसे', 'जिथे आहे तिथे' व 'जशी आहे त्या स्थितीत' **दिनांक ३०/०४/२०२५ रोजी दु. १२:०० ते ३०/०४/२०२५ रोजी १५:००** देय रक्कम कर्जदार/हमीदार यांचेकडून वसूल करण्याकरीता, स्टेट बँक ऑफ इंडिया (सेक्युअर्ड क्रेडीटर), यांचेद्वारे करण्यात येणार आहे त्याचा तपशील खालीलप्रमाणे :

अ. क्र.	कर्जदाराचे नाव	वसुलपात्र एकूण थकबाकी	स्थावर मालमत्तेचे वर्णन	राखीव किंमत (रु. मध्ये)	बयाणा रक्कम (ईएमडी) (रु. मध्ये)	मालमत्ता तपासणीसाठी वेळ आणि दिनांक
1	**श्री. सुधिर गोपाळराव पवार** पत्ता : **१.** प्राईम व्हिला रो-हाऊस नं. ०२, वडाचीवाडी, उंड्री रोड, पुणे. **२. गट नं. ५१, प्लॉट नं. ०१, ग्रीन पार्क-२, बारामती, पुणे ४१३१३३. ३. डी-४ सिद्धी विनायक अपार्टमेंट, सायली हिल्स, जळोची रोड, बारामती - ४१३१३३.**	**दि. ०९/११/२०१७ पासून रु. २८,१५,४५१/- (अठ्ठावीस लाख पंधरा हजार चारशे एकावन्न फक्त) पुढील व्याज अनुषंगिक खर्च आणि त्यावरील खर्चा इत्यादींसह**	बारामती नगरपरिषदेच्या विस्तारित हद्दीतील गाव रुई, ता. बारामती, जिल्हा-पुणे येथील प्लॉट क्रमांक ०१, गट क्रमांक ५१ वर बांधण्यात आलेली स्कीम ग्रीन पार्क-०२ मधील स्टिल्ट फ्लोअरवरील फ्लॅट क्रमांक ०९, यांसी कार्पेट क्षेत्र ५६.६४ चौमी + बाल्कनी ५.९ चौमी, म्हणजेच ८७६ चौरस फुट, विक्रीयोग्य सुपर बिल्टअप क्षेत्र ८०.५७ चौमी ही मिळकत.	**रु. २२,४७,३००/- (रुपये बावीस लाख सत्तेचाळीस हजार तिनशे फक्त)**	**रु. २,२४,७३०/- (रुपये दोन लाख चोवीस हजार सातशे तीस फक्त)**	**२८/०४/२०२५ १२:०० पासून ते २८/०४/२०२५ १५:०० पर्यंत**

विक्री ही बँकेने मंजूर केलेले सेवा पुरवठादार मेसर्स एसआयएसएल इन्फोटेक प्रा. लि. यांचेमार्फत त्यांची वेबसाईट **https://baanknet.com** द्वारे करण्यात येईल. इच्छुक बोलीदार यांनी ई-लिलाव वेबसाईट वर त्यांची नोंदणी करुन घ्यावी व त्याची खात्री करावी व **https://baanknet.com** वर दिलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार सेवा पुरवठादार यांनी केलेल्या व्हर्च्युअल वॉलेट मध्ये अनामत रक्कम जमा करावी.
इच्छुक बोलीदार ज्यांना लॉगीन आयडी व पासवर्ड, डेटा अपलोड करणे, बोली कागदपत्रे सबमीट करणे, प्रशिक्षण / प्रात्यक्षीक, ऑनलाईन बोली लावायच्या अटी व शर्ती हे करण्यामध्ये मदत हवी असेल त्यांनी **https://baanknet.com** या संकेतस्थळाला भेट द्यावी.
विक्रीच्या विस्तृत अटी व शर्ती बघण्यासाठी स्टेट बँक ऑफ इंडिया, सेक्युअर्ड क्रेडिटर यांच्या वेबसाईट वरील लिंक **https://sbi.co.in/web/sbi-in-the-news/auction-notices/sarfaesi-and-others,** आणि https://bank.sbi/web/sbi-in-the-news/auction-notices/bank-e-auctions तसेच वेबसाईट **https://baanknet.com** वर भेट द्यावी.
सदर नोटीस ही सरफेसी कायदा मधील नियम ८(६) अन्वये वैधानीक नोटीस आहे. ही वर नमूद कर्जाचे कर्जदार / हमीदार यांना सरफेसी कायदा २००२ मधील नियम ८(६) अन्वये सुद्धा वर नमूद तारखेला सुरक्षीत मालमत्तांचा लिलाव करण्यासंबंधीची नोटीस आहे.
चौकशी : मिळकत अ. क्र. १ - श्री. विवेक कुमार - ७५०६६४०१९० मुख्य व्यवस्थापक
अ. क्र. २ मधील मिळकतीसंबंधी चौकशीसाठी - श्री. सागर फुले, डेप्युटी व्यवस्थापक, मोबाईल नं. ७२१८२५९००१

ठिकाण : बारामती **अधिकृत अधिकारी**
दिनांक : १५/०४/२०२५ **टीप : स्वैर भाषांतर, तफावत असल्यास इंग्रजी ग्राह्य** **स्टेट बँक ऑफ इंडिया**

जाहीर सूचना

याद्वारे सूचना देण्यात येते की, आम्ही **1. विजया विठ्ठल आलम 2. सुदाम विठ्ठल आलम आणि 3. श्रीमती. शोभा संतोष फडके,** यांचा पत्ता-सर्व्हे क्र. 7/7/2 (भाग), गाव कांब्रे (ए.एम.), तालुका मावळ, जिल्हा पुणे येथे असून, यांच्या मोजमाप 2 एकर 0.4 गुंठे या जमिनीवरील त्यांचे सर्व हक्क, मालकी आणि हित संबंधित सर्व्हे क्र. 7/7/2 (भाग), गाव कांब्रे (ए.एम.), तालुका मावळ, जिल्हा पुणे येथे स्थित **("उक्त जमीन")** आणि यापुढे **"उक्त मालमत्ता"** म्हणून संदर्भित, या शीर्षक मालमत्तेची आम्ही चौकशी करत आहोत.

सदर मालमत्तेवर जर कोणत्याही व्यक्तीस विक्री, गहाणखत, शुल्क, भाडेपट्टा, भाडेकरार, परवाना, धारणाधिकार, हस्तांतरण, विश्वस्तव्यवस्था, बक्षीस, देवाणघेवाण, ताबा किंवा अन्यथा अशा कोणत्याही प्रकारे कोणताही दावा असल्यास अशा व्यक्तींनी अशा दाव्याच्या समर्थनार्थ असणारया कागदपत्रांसह लेखी स्वरूपात, खालील स्वाक्षरीकार यांना त्यांचे कार्यालयात- भरथानिया बिल्ड